महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
Maharashtra Industrial Development Corporation
(A Government of Maharashtra Undertaking)

मुख्य कार्यालय : "उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३. प्रिन्सिपल कार्यालय : ४,४ (ऐ) १२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-१, कफ परेड, मुंबई ४०० ००५.
Head Office : "Udyog Sarathi", Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093.
Principle Office : 4,4 (A), 12th Floor, World Trade Centre-1, Cuffe Parade, Mumbai-400 005.
☏:०२२-४७४८८३१२, ४७४८४६७९/९९
☏: +९१-०२२-४०१६१४५१/५४ (022-40161451/54)
www.midcindia.org


जा.क्र.मऔविम/भू-विभाग/म.व्य.(भूमी) /P२२१३०९

दिनांक :17 /१०/२०२५

# परिपत्रक

**विषय: एमआयडीसी औद्योगिक भूखंड मागणी अर्ज व वाटप धोरण १.०.**
**(MIDC Industrial Land Application and Allocation Policy-MILAAP १.०).**

उद्दिष्ट:

महाराष्ट्रातील औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (MID Act) आणि दी एमआयडीसी डिस्पोजल ऑफ लँड रेग्युलेशन्स १९७५ (MIDC Disposal Regulation) नुसार महाराष्ट्र राज्यात औद्योगिककरण अधिक गतिमान करतांना उद्योजकांना पारदर्शक, निष्पक्ष औद्योगिक भूखंड वाटपासाठी प्रवेशयोग्यता सुनिश्चित करणे आणि मऔवि महामंडळासाठी केवळ महसूल निर्मितीचे उद्दिष्ट न ठेवता औद्योगिक स्थापनेला प्रोत्साहन देण्यासाठी, राज्यात उद्योगांना पोषक वातावरण निर्मितीसाठी तसेच मोठ्याप्रमाणात रोजगार निर्मिती होण्यासाठी मऔवि अधिनियमानुसार महामंडळाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी महामंडळाच्या प्रचलित धोरणात कालानुरूप सुधारणा करून उद्योगभिमुख धोरण निर्गमित करणे.

भूखंड वाटपाचे प्रचलित धोरण :

दी एमआयडीसी डिस्पोजल ऑफ लँड रेग्युलेशन्स १९७५ (MIDC Disposal Regulation) नुसार, महामंडळाद्वारे स्थापित औद्योगिक क्षेत्रातील भूखंड वाटपा संदर्भात वेळोवेळी निर्णय घेवून धोरण निश्चित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. तथापि, उद्योजकांची भूखंड वाटपाची वाढती मागणीच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या अर्जांची संख्या विचारात घेवून सदर अर्जांवर विनाविलंब निर्णय होणेकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भूखंड वाटपाचे अधिकारांचे विकेंद्रिकरण केले आहे.

सदर नियमनानुसार (Regulations-१९७५) १) सार्वजनिक लिलावाद्वारे (by Public Auction/e-bidding) २) वैयक्तिक अर्ज (by entertaining Indiviual Application) स्विकारून महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंड वाटप करण्याची तरतूद आहे.

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

१) सार्वजनिक लिलावाद्वारे (by Public Auction/e-bidding) :

a) सदरहू तरतूदीनुसार महामंडळाने निविदा पध्दतीने (by Public Auction/e-bidding)) भूखंड (औद्योगिक, व्यापारी, निवासी) वाटपाचे धोरण अवलंबिलेले आहे. सदर निविदा धोरणात महामंडळाचे परिपत्रक क्र. D१४५४० दि.२६.०९.२०१६ अन्वये सुधारणाकरून अधिक पारदर्शकता आणली आहे. सदर धोरणानुसार सर्व व्यापारी व निवासी भूखंडांचे निविदाद्वारे वाटप करण्यात येते. तसेच, ज्या औद्योगिक क्षेत्रातील केवळ २० टक्के औद्योगिक जागा वाटपास उपलब्ध आहे, अशा औद्योगिक जागा/भूखंड निविदा पध्दतीने वाटप करण्यात येते.

b) निविदा प्रक्रियेतील गोपनिय माहितीची सुरक्षितता आणि निकोप स्पर्धा होण्याची गरज विचारात घेऊन परिपत्रक क्रमांक मऔविम/मव्य(भूमी)/पी१५८४१८, दिनांक १३.१२.२०२४ अन्वये महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रामधील भूखंड / शेड / गाळा, ई-निविदा पध्दतीने e-Procurement System (i.e.MahaTenders) द्वारे करण्यात करणेबाबत धोरण अवलंबिले आहे.

२) वैयक्तिक अर्ज (by entertaining Indiviual Application):

a) मऔवि अधिनियमांचे उद्देष्टे पुर्ण करण्याकरीता केवळ निविदा पध्दतीने भूखंड वाटप करून आर्थिक नफा कमविणे हा महामंडळाचा अंतिम उद्दिष्ट नसून, महाराष्ट्र राज्याचा समतोल औद्योगिक विकास घडवून त्याद्वारे आर्थिक विकास साधण्यासाठी आणि नविन उद्योग घटकांच्या स्थापनेस चालना देऊन रोजगारांच्या भरीव संधी निर्माण होण्यासाठी केवळ निविदेद्वारे सर्व प्रकारच्या भूखंडाचे वाटप करून औद्योगिक विकास साधणे शक्य होणार नाही. त्यामुळे दी एमआयडीसी डिस्पोजल ऑफ लँड रेग्युलेशन्स १९७५ (MIDC Disposal Regulation) मधील तरतूदींनुसार वैयक्तिक अर्ज (by entertaining Indiviual Application) स्विकारून भूखंड वाटपाचे धोरण आहे.

b) मुंबई, पुणे, नाशिक या भौगोलिक पट्टयात उद्योगांचे होणारे केंद्रीकरण टाळण्यासाठी आणि राज्यातील अविकसित भागात देखील उद्योगधंदे स्थापित होवून औद्योगिकरणास चालना देण्यासाठी, तसेच अशा भौगोलिक प्रदेशातील स्थानिकांना रोजगार मिळण्याच्या उद्देषाने महामंडळाच्या ज्या औद्योगिक क्षेत्रात वाटपास उपलब्ध औद्योगिक भूखंड/जागा ८० टक्के पर्यंत शिल्लक आहे, अशा औद्योगिक क्षेत्रातील औद्योगिक भूखंडाचे वाटप सरळ पध्दतीने (Online Direct Allotment Portal) म्हणजेच वैयक्तिक ऑनलाईन अर्ज (by entertaining Indiviual Application) स्विकारण्याचे धोरण अवलंबिले आहे.

c) तसेच, महाराष्ट्र शासनाचे नविन औद्योगिक धोरण-२०१९ आणि महामंडळाचे परिपत्रक क्र. C७५०९५ दि. २०.०८.२०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार सन-२०१९ स्थापित करण्यात आलेल्या औद्योगिक क्षेत्रातील १० टक्के/२० टक्के MSME करीता राखीव औद्योगिक

भूखंडाचे वाटप सरळ पध्दतीने (Online Direct Allotment) म्हणजेच वैयक्तिक अर्ज (by entertaining Indiviual Application) स्विकारण्याचे धोरण अवलंबिले आहे. त्याकरीता Online Direct Allotment Portal द्वारे ऑनलाईन अर्ज स्विकारून भूखंड वाटप करण्यात येते.

d) उपरोक्त २(b) व २(c) मध्ये नमूद वगळून राज्य शासनाच्या धोरणानुसार आणि काही **महत्त्वाच्या उद्योगांना** महाराष्ट्र राज्यात स्थापित करण्यासाठी आणि राज्याच्या औद्योगिकरणात भर घालण्याच्या उद्देशाने महामंडळाने काही **निवडक प्रकारातील उद्योग** तसेच उद्योगातील गुंतवणूक आणि होणारी रोजगार निर्मिती इत्यादी निकष ठरविले आहेत. सदर निकषांची पूर्तता/अहर्ता प्राप्त उद्योगांना त्यांनी मागणी केलेल्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंड (औद्योगिक जागा/भूखंडाची वाटपाची टक्केवारी विचारात न घेता) वैयक्तिक ऑनलाईन अर्ज (by entertaining Indiviual Application) स्विकारून औद्योगिक भूखंड वाटपाचे धोरण अवलंबिले आहे. त्यास "प्राधान्याने भूखंडाचे वाटप धोरण" (Priority Land Allotment) असे संबोधण्यात आले आहे. सदरहू धोरण केवळ औद्योगिक भूखंडांकरीता (म्हणजेच व्यापारी व निवासी वगळून) लागू करण्यात आले आहे. त्याकरीता Priority Land Allotment Portal द्वारे (परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/ई२४५३२, दिनांक २९.११.२०१७ अन्वये) ऑनलाईन अर्ज स्विकारून, तांत्रिक छाननी करून आणि प्रचलित दरावर अतिरिक्त १० टक्के अधिमुल्याची आकारणी करून भूखंड वाटप करण्यात येत आहे.

भूखंड वाटपाच्या प्रचलित धोरणात सुधारणा करण्याची आवश्यता:

मऔवि महामंडळाच्या भूखंड वाटप धोरणामध्ये अधिक पारदर्शकता, सुसुत्रता आणून स्पर्धात्मक वातावरण निर्माण होण्याच्या दृष्टीने आणि शासनाच्या Ease of Doing Business (EoDB) धोरणाच्या अनुषंगाने भूखंड वाटपाची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक, सुसूत्रित व गतिमान आणि उद्योगभिमूक होण्यासाठी उद्योजकांना भूखंड वाटपाच्या धोरणामध्ये कालानुरूप सुधारणाकरणे आवश्यक आहे.

तसेच, राज्य शासनाच्या १०० व १५० दिवसांच्या कृती आराखड्यानुसार (शासन निर्णय दि.३०.०५.२०२५) शासन ते उद्योग यामध्ये सुसंवाद (G२B-Govt ot Business Interaction) राज्यातील उद्योगवाढीला अधिकाधिक प्रोत्साहन देण्याबाबत मा. मुख्यमंत्री यांचे निर्देश असून, सदर उद्योगांना सर्व सेवा ई-प्रशासनाद्वारे मिळणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने सर्व कार्यालयाने त्यांच्या अंतर्गतच्या उद्योगाबाबतच्या सेवा कार्यक्षमतेने व उद्योगवाढीला प्रोत्साहीत करण्यासाठी कामकाजातील कार्यक्षमता वाढविण्यासाठी प्रत्येक सेवेसाठी GPR (Govt Process Reengieering) करण्याचे निर्देश आहेत.

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

त्याअनुषंगाने प्राधान्य सदराखालील उद्योगांबाबत त्या-त्या वेळच्या परिस्थितीनुसार आणि आवश्यतेनुसार वेगवेगळ्या परिपत्रकान्वये वेगवेगळी धोरणे निर्गमित केली गेली असल्यामुळे होणारी अडचण दूर करण्यासाठी सदर परिपत्रके रद्द/अधिक्रमित (परिशिष्ट-२ मध्ये नमूद) करून प्रचलित परिपत्रकांचे एकत्रिकरण करून एकच सविस्तर सुधारित धोरण निर्गमित करून भूखंड वाटपाच्या धोरणात अधिक सुलभता व गतिमानता आणण्यासाठी खालील प्रमाणे सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव मा. सदस्य मंडळाच्या दिनांक १२.०९.२०२५ रोजीच्या बैठक क्रमांक ४०७ मध्ये सादर करण्यात आला होता. त्याअनुषंगाने, मा. सदस्य मंडळाने ठराव क्रमांक ७०३९ पारीत केला आहे. तसेच, मा. सदस्य मंडळाच्या दिनांक ०६.१०.२०२५ रोजीच्या बैठक क्रमांक ४०८ मधील ठराव क्रमांक ७०५४ पारीत केला आहे. सदर बैठकीत सुधारणांसह पारीत ठरावास मंजूरी प्राप्त झाली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे धोरण निर्गमित करण्यात येत आहे.

भूखंड वाटपाचे सुधारित धोरण:

मऔवि अधिनियमातील उद्देष्टे पुर्ण करण्यासाठी आणि दी एमआयडीसी डिस्पोजल ऑफ लँड रेग्युलेशन्स १९७५ (MIDC Disposal Regulation) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचेद्वारे महामंडळाच्या भूखंड वाटपाच्या धोरणात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे. सुधारीत धोरणास "एमआयडीसी औद्योगिक भूखंड वाटप धोरण (MIDC Industrial Land Application and Allocation Policy-MILAAP)" असे संबोधण्यात यावे.

## एमआयडीसी औद्योगिक भूखंड वाटप धोरण (MIDC Industrial Land Application and Allocation Policy-MILAAP)

MILAAP नुसार महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंड वाटपाच्या पद्धती



## A) विना-निविदा सरळ पध्दतीने औद्योगिक भूखंड वाटप (Direct Allotment without Bidding) : अति महत्त्वाचे आणि शासनाचे प्रकल्प

केंद्र व राज्य शासनाचे महत्त्वाचे उद्योग आणि उपक्रमांसह, राज्यात मोठी गुंतवणूक आणणाऱ्या विशाल /अतिविशाल प्रकल्प आणि महामंडळाने अथवा राज्य शासनाच्या उद्योग विभागामार्फत सामंजस्य करार (MoU) करण्यात आलेल्या कंपन्या इत्यादी राज्यात मोठी गुंतवणूक करून औद्योगिकीकरण आणि रोजगार निर्मिती मध्ये महत्त्वाचा वाटा उचलत असल्यामुळे तसेच, असे मोठे उद्योग इतर राज्यात न जाता महाराष्ट्र राज्यात आकर्षित करण्यासाठी अशा विशिष्ट प्रकारातील उद्योगांना विना-निविदा सरळ पध्दतीने औद्योगिक भूखंड वाटप (Direct Allotment without Bidding) करणे आवश्यक आहे. त्यानुसार, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशानुसार अशा प्रवर्गातील/प्रकारातील उद्योगांची यादी निश्चित करतील.

I) प्रवर्ग (Categories of Industries):

खालील नमूद प्रवर्गातील (Categories of Industries) अति महत्त्वाचे आणि शासनाचे प्रकल्प यांना विना-निविदा सरळ पध्दतीने औद्योगिक भूखंडाचे वाटप (Direct Allotment without Bidding) करण्यात यावे.

१) **महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त विशाल / अतिविशाल प्रकल्प (Mega & Ultra Mega Project):** महाराष्ट्र राज्यात पायाभूत सुविधा, रोजगार आणि अर्थव्यवस्था यामध्ये लक्षणीय वाढ होण्याच्या दृष्टीने सामुहिक प्रोत्साहन योजना अन्वये घटकाचा प्रवर्ग, गुंतवणूक आणि रोजगारावर आधारित वर्गीकरणानुसार शासनाने मान्यता प्रदान केलेल्या विशाल / अतिविशाल प्रकल्प.

२) **औद्योगिक प्रयोजनाशी निगडीत महाराष्ट्र व केंद्र सरकारचे उपक्रम (Public Sector Undertakings -PSU) तसेच इतर राज्याचे शासकीय उपक्रम :-** महाराष्ट्र व केंद्र सरकारचे उपक्रम तसेच इतर राज्याचे शासकीय उपक्रम हे औद्योगिक विकासाला चालना देऊन आणि रोजगार निर्मीती करुन अर्थव्यवस्थेमध्ये महत्वाची भूमिका बजावणारे उपक्रम (Public Sector Undertakings).

३) **राज्य शासनाच्या उद्योग विभागामार्फत सामंजस्य करार (Memorandum of Understanding -MoU) करण्यात आलेल्या कंपन्या :**

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागातील सचिव व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांसोबत व दावोस येथे आयोजित जागतिक आर्थिक परिषद (World Economic Forum) तसेच मॅग्नेटिक महाराष्ट्र अंतर्गत विविध नामांकित कंपन्यांसोबत सामंजस्य करार (MoU) करण्यात येतात. महाराष्ट्र राज्यात मोठी गुंतवणूक तसेच मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत असतो. राज्याच्या औद्योगिक विकासाला चालना देणासाठी शासनाने सामंजस्य करार केलेल्या अशा कंपन्यांना महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात भूखंड वाटप करण्यात यावा.

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

४) भूखंडधारकाने/अर्जदाराने मागणी केलेले क्षेत्र (औद्योगिक/व्यापारी/निवासी) Land Lock असल्यास व सदर क्षेत्र इतर कोणालाही वाटप करणे शक्य नसल्यास त्यासंदर्भात संबंधित कार्यकारी अभियंता यांचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल (रंगीत फोटो सह) घेण्यात यावा. तथापि, वाटपाचा दर आधारभूत दराच्या १५० टक्के राहील. तसेच, एकापेक्षा जास्त लगतच्या भूखंडधारकांनी अशी Land Lock जागेची मागणी केल्यास त्यांच्यात Close Bidding घेऊन उच्चतम दर देणाऱ्यास भूखंड वाटप करण्यात यावा.

५) सोयी-सुविधा तसेच दि. ०९.०२.२०१०, १५.०३.२०२४ व १३.०८.२०२४ रोजीच्या परिपत्रकानुसार सवलतीच्या दराने भूखंडाचे वाटप करणे.

६) **महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंडधारकाने लगतचा भूखंड आणि/किंवा त्याच औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाची उद्योग विस्ताराकरीता मागणी केल्यास (Adjacent-Common boundry and/or plot within same Industrial Area):**

६.१.उद्योग विस्ताराकरिता भूखंड वाटप करताना भूखंडधारकास मुळ भूखंड / शेड /गाळाच्या क्षेत्रफळाच्या कमाल **दोन ते अडीच पट** क्षेत्र वाटप करण्यात यावे.

६.२.ज्या भूखंडावरील उद्योगाच्या विस्ताराकरीता मागणी केली आहे, तो उद्योग पूर्ण क्षमतेने (Full Capacity) सुरू असणे आवश्यक आहे.

६.३.मुळ भूखंडावर जे प्रयोजन सुरू आहे त्याच/अनुषंगीक प्रयोजनासाठी (Same line of Products) भूखंड मागणी असावी.

६.४.मुळ भूखंड/भूखंडाचे काही क्षेत्र सबलिज/सबलेट (अधिकृत/अनधिकृत रित्या) केलेले नसावे.

६.५.मुळ भूखंडावर कोणतीही मऔवि महामंडळास देय थकबाकी नसावी, त्याकरीता No-Dues Certificate अनिवार्य आहे.

६.६.MMR (तारापूर, पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रासह) व PMR तसेच अन्य महानगरपालिका (मनपा) क्षेत्रातील औद्योगिक क्षेत्रात भूखंडधारकाने मूळ भूखंडावर किमान ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त चटई निर्देशांकाचा वापर करून, भोगवटा प्रमाणपत्र (OC/BCC) घेतलेले असणे अनिवार्य आहे. अशा भूखंडावरील गुंतवणूक खालीलप्रमाणे असणे आवश्यक आहे.

| क्षेत्र (चौ.मी.) | किमान गुंतवणूक (रुपये कोटीत) (Working Capital वगळून) | |
|---|---|---|
| | "अ" प्रभाग | "ब" प्रभाग |
| ५०० चौ.मी पर्यंत | ५ | २.५ |
| ५०१ ते १००० चौ.मी पर्यंत | १० | ५ |
| १००१ चौ.मी. व त्यापेक्षा जास्त | २० | १० |

६.७. इतर प्रभागात भूखंडधारकाने मूळ भूखंडावर किमान ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त चटई निर्देशांकाचा वापर करून, भोगवटा प्रमाणपत्र (OC/BCC)घेतलेले असणे अनिवार्य आहे. अशा भूखंडावरील गुंतवणूक खालीलप्रमाणे असणे आवश्यक आहे.

| क्षेत्र (चौ.मी.) | किमान गुंतवणूक (रुपये कोटीत) (Working Capital वगळून) | |
|---|---|---|
| | "क" प्रभाग | "ड व ड+" प्रभाग |
| ५०० चौ.मी पर्यंत | ०.७५ | ०.५ |
| ५०१ ते १००० चौ.मी पर्यंत | १.५ | १ |
| १००१ चौ.मी. व त्यापेक्षा जास्त | ३ | २ |

६.८. जर लगतच्या दोन भूखंडधारकांनी आणि/किंवा त्याच औद्योगिक क्षेत्रातील भूखंडधारकांनी (Adjacent Plot Common Boundry and/or plot within same Industrial Area) उद्योग विस्ताराकरीता अर्ज सादर केला असेल आणि दोन पेक्षा जास्त अर्जदार/भूखंडधारक तांत्रिक दृष्या पात्र होत असल्यास प्रकल्प अहवाल, गुंतवणूक, तंत्रज्ञान, मुळ भूखंडाचा वापर/बीसीसी (चटई निर्देशांकाचा वापर), work orders in hand इत्यादी विचारात घेवून भू-वाटप समिती निर्णय घेईल.

६.९. सोबत जोडलेल्या उद्योग विस्तारासाठी परिशिष्टांमध्ये नमूद अर्जदाराने सादर करावयाची कागदपत्रे व तपासणी सुचीनुसार पात्र उद्योजकांचे निकष तपासण्यात येऊन छाननीअंती भूखंड वाटपाबाबत निर्णय घेण्यात यावा.

**७) सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना (MSME) राखीव भूखंड :**

| प्रभाग | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|
| अ | २,५०० चौ.मी. पर्यंत महामंडळाच्या धोरणानुसार MSME राखीव भूखंड |
| ब आणि क | |
| ड आणि ड+ | |

७.१.MSME राखीव भूखंडास अर्ज सादर करतांना सविस्तर प्रकल्प अहवालासह (DPR) (परिशिष्ट-१ मध्ये नमूद प्रमाणे) उद्यम नोंदणी (Udaym/MSME Registration), महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र तसेच आरक्षणानुसार (लागू असल्यास) जात पडताळणी प्रमाणपत्र (Caste Validity), दिव्यांग प्रमाणपत्र, माजी सैनिक प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे प्रकल्प अहवालासोबत सादर करणे अनिवार्य.

७.२.एकाच भूखंडासाठी एकापेक्षा जास्त अर्जदार पात्र ठरल्यास सदर पात्र अर्जदारांमध्ये Close Bidding ऑनलाईन घेण्यात येईल आणि उच्चतम दर अर्जदारास भूखंड वाटप करण्यात येईल.

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

८) केंद्र शासनाच्या सुक्ष्म, लघु उपक्रम-औद्योगिक समुह विकास योजना -Micro, Small Enterprises - Cluster Development Program (MSE-CDP) अंतर्गत राज्यस्तरीय समितीने मान्यता दिलेले औद्योगिक समुह किंवा राज्य शासनाच्या महाराष्ट्र स्मॉल इंडस्ट्रिज क्लस्टर डेव्हलपमेंट प्रोग्राम (MSICDP) महाराष्ट्र लघू उद्योग औद्योगिक समूह विकास कार्यक्रमा अंतर्गत मान्यता दिलेले औद्योगिक समुहास (Government Approved Industrial Cluster) :

८.१. MSE-CDP अंतर्गत राज्यस्तरीय समितीने मान्यता दिलेले औद्योगिक समुहास भूखंडाचे वाटपपत्र प्राप्त झाल्यानंतर केंद्र शासनाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

८.२. उद्योग समूहाची किमान गुतंवणूक

| अ. क्र. | किमान क्षेत्र (चौ.मी.) | समुहाची प्रकल्पातील प्रभागनिहाय किमान गुंतवणूक (रुपये कोटीत) | |
|---|---|---|---|
| १ | समुहातील प्रत्येक सभासदास कमाल २०० चौ.मी. क्षेत्र अनुज्ञेय (प्रत्येक समूहात किमान २० सभासद संख्या आवश्यक ) | अ आणि ब | १०० |
| २ | | क | ५० |
| ३ | | ड आणि ड+ | २० |

८.३. तांत्रिक सल्लागार यांनी औद्योगिक समुहाच्या मंजुरीची तसेच प्रकल्पातील गुंतवणूकीसंदर्भात तसेच सभासद संख्या व मागणी क्षेत्र याच्या गुणोत्तराबाबत तपासणी करावी.

८.४. भूखंड वाटप करताना 'अ' आणि 'ब' औद्योगिक क्षेत्रातील भूखंड वाटपादरम्यान Jt SPV स्थापन करणेच्या अटीवर तसेच प्राप्त अर्जदारांचे प्रकल्प अहवाल तपासून भूखंड वाटप करण्यात यावा.

८.५. समूहातील सर्व सभासदांची यादी (संपूर्णनाव, पॅनकार्ड ) सादर करणे अनिवार्य आहे.

८.६. केंद्र शासनाच्या सुक्ष्म, लघु उपक्रम-औद्योगिक समुह विकास योजना -Micro, Small Enterprises - Cluster Development Program (MSE-CDP) अंतर्गत राज्यस्तरीय समितीने मान्यता दिलेले औद्योगिक समुह किंवा राज्य शासनाच्या महाराष्ट्र स्मॉल इंडस्ट्रिज क्लस्टर डेव्हलपमेंट प्रोग्राम (MSICDP) महाराष्ट्र लघू उद्योग औद्योगिक समूह विकास कार्यक्रमा अंतर्गत मान्यता दिलेले औद्योगिक समुहास सामाईक सुविधा केंद्राकरीता (CFC) भूखंड वाटप करण्यात यावा.

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

## B) कॅप ई-निविदेद्वारे औद्योगिक भूखंड वाटप (Industrial Plot Allotment by Cap e-bidding):

महाराष्ट्र शासनाचे धोरणाच्या अनुषंगाने आणि मऔवि अधिनियमाचे उद्दिष्टपुर्ती करणेकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम निश्चित करतील असे औद्योगिक भूखंड तसेच विशिष्ट प्रकारचे निवडक उद्योग (Specific Important Categories of Industries), तसेच राज्यात मोठी गुंतवणूक करून रोजगार निर्मिती करणारे उद्योग आणि महत्त्वाच्या उद्योगांना उद्योग उभारणीसाठी मोठ्या आकाराच्या क्षेत्राची आवश्यकता असल्यामुळे आणि त्यांची प्रकल्पातील गुंतवणूक ही मोठी असल्यामुळे तसेच, अशा उद्योगांमुळे मोठ्या प्रमाणात होणारी रोजागार निर्मिती विचारात घेता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी काही विशिष्ट प्रवर्गातील उद्योगांना विना-निविदा भूखंड वाटप न करता **कॅप निविदेद्वारे औद्योगिक भूखंड वाटप** (Industrial Plot Allotment by Cap e-bidding) औद्योगिक भूखंडाचे वाटप करण्यात यावे, जेणे करून उद्योजकांना प्रोत्साहन मिळुन अधिकाधिक गुंतवणूक करून राज्यात उद्योग उभा करतील.

I) प्रवर्ग (Categories of Industries):

खालील नमूद प्रवर्गातील (Categories of Industries) महत्त्वाचे निवडक उद्योगांना (Specific Important Categories of Industries) व राज्यात मोठी गुंतवणूक व रोजागार निर्मिती करणारे उद्योगांना कॅप निविदेद्वारे औद्योगिक भूखंड वाटप (Industrial Plot Allotment by Cap e-bidding) करण्यात येईल.

१) <u>महाराष्ट्रात परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक (Foreign Direct Investment FDI) आणणारे उद्योग (FDI Guidelines) :</u>

*(a):* FDI कंपन्यांना प्राधान्याने भूखंड वाटपाकरिता किमान गुंतवणूक व वाटप करावयाच्या क्षेत्राबाबत निकष खालीलप्रमाणे असतील.

| विभाग | क्षेत्र (चौ.मी.) | किमान परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक (FDI) ( रुपये कोटीत) |
|---|---|---|
| अ | २,५०० चौ.मी. व त्यापेक्षा जास्त | १०० |
| ब | | ५० |
| क, ड आणि ड+ | | २० |

*(b):* किमान paid up equity स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या (FCI) किमान १० टक्के असणे आवश्यक आहे.

*(c):* गुंतवणूकीचे टप्पे (FDI inflow)

| अ.क्र. | प्रकल्प कार्यान्वित होण्याचे टप्पे | किमान परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक (FDI)- संचयी (Cumulative) |
|---|---|---|
| १. | भूखंड वाटपापूर्वी | किमान भूखंडाच्या अधिमुल्याच्या रक्कमेइतकी |
| २. | बांधकाम नकाशे मंजूरीपूर्वी | एकूण प्रस्तावित परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीच्या (FDI) २५ टक्के |
| ३. | इमारत पूर्णत्वाचा दाखला (BCC / OC) मंजूरीपूर्वी | एकूण प्रस्तावित परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीच्या(FDI) ७५ टक्के |
| ४. | उत्पादनास सुरुवात करण्यापूर्वी | एकूण प्रस्तावित परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीच्या(FDI) ९० टक्के |

*(d):* कंपनीने भूखंडाचा ताबा प्राप्त झाल्यापासुन उत्पादनास सुरुवात करण्यापूर्वी प्रकल्पामध्ये ९० टक्के प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक (FDI) करणे अनिवार्य आहे. तथापि, भूखंडधारकाच्या आवाक्याबाहेरील परिस्थितीमध्ये (परिपत्रक क्रमांक पी-१५५८५०, दिनांक ०७.०१.२०२५ मध्ये नमूद परिस्थितीमध्ये) वरीलप्रमाणे ९० टक्के प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक (FDI) करण्याकरिता १ वर्षाचा वाढीव कालावधी देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे आहेत.

*(e):* जे भूखंडधारक वरील कालावधीमध्ये (वाढीव कालावधीसह) त्यांचे प्रकल्पात परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक (FDI) करुन शकणार नाहीत, अशा भूखंडधारकांकडून प्रचलित दराच्या प्रती वर्ष १० टक्के दंडनीय रक्कम आकारण्यात यावी.

*(f):* प्रकल्पामध्ये Equity स्वरुपात परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक (FDI) झाल्यासंदर्भात भूखंडधारकास भूखंड विकासाच्या उपरोल्लेखीत टप्प्यांवर भूखंडधारकाच्या वित्तीय संस्थेकडुन / बँकेकडुन Inward Remittance Certificate महामंडळास सादर करणे अनिवार्य आहे.

२) **महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंडधारकाने मुळ औद्योगिक क्षेत्रा व्यतिरीक्त इतर औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाची उद्योग विस्ताराकरीता मागणी केल्यास** (Plot in different Industiral area for Expansion) :

*(a):* उद्योग विस्ताराकरिता भूखंड वाटप करताना भूखंडधारकास मुळ भूखंड / शेड /गाळाच्या क्षेत्रफळाच्या कमाल **दोन ते अडीच पट** क्षेत्र वाटप करण्यात यावे.

*(b):* ज्या भूखंडावरील उद्योगाच्या विस्ताराकरीता मागणी केली आहे, तो उद्योग पूर्ण क्षमतेने (Full Capacity) सुरू असणे आवश्यक आहे.

*(c):* मुळ भूखंडावर जे प्रयोजन सुरू आहे त्याच/अनुषंगीक प्रयोजनासाठी (Same line of Products) भूखंड मागणी असावी.

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

*(d):* मुळ भूखंड/भूखंडाचे काही क्षेत्र सबलिज/सबलेट (अधिकृत/अनधिकृत रित्या) केलेले नसावे.

*(e):* मुळ भूखंडावर कोणतीही मऔवि महामंडळास देय थकबाकी नसावी, त्याकरीता No-Dues Certificate अनिवार्य आहे.

*(f):* MMR (तारापूर, पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रासह) व PMR तसेच अन्य महानगरपालिका (मनपा) क्षेत्रातील औद्योगिक क्षेत्रात भूखंडधारकाने मूळ भूखंडावर किमान ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त चटई निर्देशांकाचा वापर करून, भोगवटा प्रमाणपत्र (OC/BCC) घेतलेले असणे अनिवार्य आहे. अशा भूखंडावरील गुंतवणूक खालीलप्रमाणे असणे आवश्यक आहे.

| क्षेत्र (चौ.मी.) | किमान गुंतवणूक (रुपये कोटीत) (Working Capital वगळून) | |
|---|---|---|
| | "अ" प्रभाग | "ब" प्रभाग |
| ५०० चौ.मी पर्यंत | ५ | २.५ |
| ५०१ ते १००० चौ.मी पर्यंत | १० | ५ |
| १००१ चौ.मी. व त्यापेक्षा जास्त | २० | १० |

*(g):* इतर प्रभागात भूखंडधारकाने मूळ भूखंडावर किमान ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त चटई निर्देशांकाचा वापर करून, भोगवटा प्रमाणपत्र (OC/BCC)घेतलेले असणे अनिवार्य आहे. अशा भूखंडावरील गुंतवणूक खालीलप्रमाणे असणे आवश्यक आहे.

| क्षेत्र (चौ.मी.) | किमान गुंतवणूक (रुपये कोटीत) (Working Capital वगळून) | |
|---|---|---|
| | "क" प्रभाग | "ड व ड+" प्रभाग |
| ५०० चौ.मी पर्यंत | ०.७५ | ०.५ |
| ५०१ ते १००० चौ.मी पर्यंत | १.५ | १ |
| १००१ चौ.मी. व त्यापेक्षा जास्त | ३ | २ |

*(h):* सोबत जोडलेल्या उद्योग विस्तारासाठी परिशिष्टांमध्ये नमूद अर्जदाराने सादर करावयाची कागदपत्रे व तपासणी सुचीनुसार पात्र उद्योजकांचे निकष तपासण्यात येऊन छाननी अंती भूखंड वाटपाबाबत निर्णय घेण्यात यावा.

*(i):* त्याच औद्योगिक क्षेत्रात उद्योग विस्तार व इतर प्रकार/प्रवर्गातील (नविन उद्योगकरीता) अर्ज प्राप्त झाल्यास उद्योग विस्ताराअंतर्गत अर्ज सादर केलेल्या अर्जदारास (भूखंडधारकास) Right of first Refusal (ROFR or RFR) संधी देणेबाबत भू-वाटप समिती निर्णय घेईल.

*(j):* मुळ उद्योग असणाऱ्या औद्योगिक क्षेत्रा व्यतिरिक्त इतर औद्योगिक क्षेत्रात उद्योग विस्ताराअंतर्गत अर्ज सादर करणाऱ्या उद्योजक आणि इतर अर्जदार यांची समान बोली असल्यास, उद्योग विस्ताराअंतर्गत अर्जदारास प्राधान्य देण्यात येईल.

३) **ज्या कंपन्या भारतातील इतर राज्ये किंवा केंद्रशासीत प्रदेशात उत्पादन कार्य करणाऱ्या असतील आणि महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात नव्याने गुंतवणूक करणार आहेत** (Other State Industries) **अशा कंपन्या :**

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

*(a):* अशा कंपनीची इतर राज्यात किंवा केंद्रशासीत प्रदेशात कमीत कमी रुपये ५० कोटी गुंतवणूक (Fixed Capital Investment - FCI) असणे आवश्यक आहे. त्याबाबतचे दस्तऐवज सादर करणे अनिवार्य आहे.

*(b):* अशा कंपन्यांना महाराष्ट्र राज्यात त्यांची प्रकल्पातील किमान गुंतवणूकीचे (FCI) निषक आणि वाटप करावयाचे क्षेत्र खालीलप्रमाणे आहे.

| विभाग | क्षेत्र (चौ.मी.) | किमान गुंतवणूक ( रुपये कोटीत) |
|---|---|---|
| अ आणि ब | २,५०० चौ.मी. व त्यापेक्षा जास्त | १०० |
| क | | ५० |
| ड आणि ड+ | | २० |

*(c):* कंपनीने केलेली गुंतवणूक ही महाराष्ट्र राज्यात त्यांच्या इतर राज्यातील मुळ प्रकल्पाच्या विस्ताराकरिता नविन गुंतवणूक असावी.

४) **महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात वाटप <u>केलेल्या मेगा व अल्ट्रा मेगा प्रकल्पांच्या Vendors कंपन्या (Vendors of the Anchor Unit) :</u>**

*(a):* अँकर युनिट (Anchor Unit) कंपनीने त्यांच्या पुरवठादार कंपन्यांना (Vendors) भूखंड मिळण्याकरिता शिफारस केली असणे आवश्यक आहे व अशा अँकर युनिट (Anchor Unit) कंपनीने पुरवठादार कंपनीची त्याच औद्योगिक क्षेत्रातील त्यांच्या युनिटसाठीची भूखंडाची अनिवार्यता प्रमाणित करणे आवश्यक आहे.

*(b):* ई-अर्ज करताना, खालील कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे.

I. तो Anchor कंपनीचा पुरवठादार असल्याबाबत Anchor कंपनीकडुन प्रमाणपत्र,
II. उत्पादित मालासाठी प्राप्त झालेल्या मागणीपत्राच्या Order in hand प्रमाणित प्रती
III. Anchor व Vendor कंपन्यातील ५ वर्षांसाठीचा करार झाल्याच्या प्रमाणित प्रती
IV. पुरवठादार कंपन्यांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (परिशिष्ट १ नुसार)
V. आवश्यक अन्य सर्व कागदपत्र / दस्तऐवज,
VI. शासकीय परवाने इत्यादि

*(c):* अँकर युनिट (Anchor Unit) कंपनी अथवा पुरवठादार (Vendor) कंपनीने सादर केलेली माहिती/कागदपत्रे खोटी अथवा चुकीची आढळ्यास, माहिती/कागदपत्रे सदर करणाऱ्या कंपनीस भूखंड वाटपासाठीचा अर्ज विचारात घेण्यात येणार नाही/वाटप झाल्यानंतर माहिती/कागदपत्रे खोटी अथवा चुकीची आढळ्यास, अर्ज नाकारण्यात येईल अथवा भूखंड वाटप रद्द करण्यात येवून खोटी माहिती सादर केल्याबाबत कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.

*(d):* पुरवठादार कंपन्यांना प्रभागनिहाय वाटप करावयाचे क्षेत्र व गुंतवणूक निकष:-

| अ. क्र. | प्रभाग | क्षेत्र (चौ.मी.) | किमान गुंतवणूक (रुपये कोटीत) |
|---|---|---|---|
| १ | अ व ब | मूळ Anchor कंपनीच्या वाटप क्षेत्राच्या १० टक्के क्षेत्रापेक्षा जास्त नाही, इतके क्षेत्र. | १०० |
| २ | क | | ५० |
| ३ | ड व ड+ | | २० |

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

५) **इलेक्ट्रिक वाहन, ॲडव्हान्स केमिस्ट्री सेल (ACC) बॅटरी निर्मितीचे कारखाने, इलेक्ट्रिक वाहनांचे सुट्टे भाग आणि त्याचे recycling कारखाने.**

*(a):* किमान गुंतवणूक

| प्रभाग | क्षेत्र (चौ.मी.) | मान गुंतवणूक (FCI) ( रुपये कोटीत) |
|---|---|---|
| अ आणि ब | २,५०० चौ.मी. व त्यापेक्षा जास्त | १०० |
| क | | ५० |
| ड आणि ड+ | | २० |

६) **शासनाच्या नविन औद्योगिक धोरणांतर्गत (२०१९) प्राधान्य क्षेत्रांना (Thrust Sector) :**

*(a):* शासनाच्या दिनांक ०७.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार निर्गमित करण्यात आलेल्या नवीन औद्योगिक धोरण-२०१९ मध्ये नमूद खालील प्राधान्य क्षेत्रांना (Thrust Sectors) भूखंड वाटप करण्यात यावे.

i. हवाई व संरक्षण उत्पादन उद्योग
ii. उद्योग ४.० (कृत्रिम बुध्दीमत्ता, त्रिमिती छपाई, महाजाल, यंत्रमानव विज्ञान, अतिसूक्ष्मतंत्रज्ञान इत्यादि)
iii. एकात्मिक डेटा सेंटर पार्कस् (IDCP)
iv. वस्त्रोद्योग यंत्रसामुग्रीचे उत्पादन
v. जैव तंत्रज्ञान, वैद्यकीय निदान उपकरणे
vi. कृषी व अन्न प्रक्रिया उद्योग (फक्त द्वितीय व तृतीय अन्न प्रक्रिया उद्योग)
vii. माहिती तंत्रज्ञान (IT) व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा (ITeS)
viii. इलेक्ट्रॉनिक प्रणाली संरचना व उत्पादन (ESDM) व सेमीकंडक्टर फॅब्रिकेशन (FAB)
ix. हरित ऊर्जा / जैवइंधनाचे उत्पादन
x. क्रिडा व व्यायामशाळा उपकरण उत्पादन
xi. अणुऊर्जा प्रकल्पांच्या उपकरणांचे उत्पादन
xii. खनिज व वन आधारित उद्योग.
xiii. **लॉजिस्टिक प्रयोजनाकरिता** (महाराष्ट्र राज्याचे लॉजिस्टिक धोरण-२०२४ मध्ये नमूद प्रयोजनाकरिता (activity) भूखंडाचे वाटप करण्यात यावे.)
xiv. **नैसर्गिक वायुचे द्रवरुप (LNG) किंवा विविध दाबाखाली (PNG) वाहिकेद्वारे वहन (Transmission), दाब वाढविणे (Compression), साठवणूक (Storage) आणि वितरण (Distribution & Dispensing) करणारे उद्योजक.**
xv. **अवकाश संशोधनासाठी यंत्र सामुग्री बनविणारे उद्योग.**

*(b):* उपरोक्त (a) मध्ये नमूद बाबींकरीता किमान गुंतवणूक.

| विभाग | क्षेत्र (चौ.मी.) | किमान गुंतवणूक (FCI) ( रुपये कोटीत) |
|---|---|---|
| अ आणि ब | २,५०० चौ.मी. व त्यापेक्षा जास्त | ५० |
| क | | १० |
| ड आणि ड+ | | ५ |

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

७) संरक्षण विभागाकरिता यंत्रसामुग्री पुरविणारे उद्योजक :

*(a):* किमान गुंतवणूक.

| प्रभाग | क्षेत्र (चौ.मी.) | किमान गुंतवणूक (रुपये कोटीत) |
|---|---|---|
| अ आणि ब | २,५०० चौ.मी. व त्यापेक्षा जास्त | १०० |
| क | | ५० |
| ड आणि ड+ | | २० |

*(b):* संरक्षण विभागाकरिता यंत्रसामुग्री पुरविणा-या उद्योजकांना भूखंड वाटप करताना त्यासंदर्भातील आवश्यक ती कागदपत्रे / दस्तऐवज, शासकीय परवाने, Order in hand, इत्यादि सादर करणे आवश्यक आहे.

८) 'अ' व 'ब' प्रभागातील औद्योगिक क्षेत्रात फॉर्च्युन ग्लोबल-५०० / इकॉनॉमिक टाईम्स-२००, 'क', 'ड' व 'ड'+ वर्गात मोडणाऱ्या औद्योगिक क्षेत्रात फॉर्च्युन ग्लोबल-२००० / इकॉनॉमिक टाईम्स-५०० कंपन्या.

९) महामंडळाच्या अ, ब, क, ड आणि ड+ विभागातील औद्योगिक क्षेत्रामध्ये उद्योगांना गुंतवणूकीच्या आधारावर :

| प्रभाग | क्षेत्र (चौ.मी.) | किमान गुंतवणूक (FCI) ( रुपये कोटीत) |
|---|---|---|
| अ | २,५०० चौ.मी. व त्यापेक्षा जास्त | ५० |
| ब | | २५ |
| क | | २० |
| ड आणि ड+ | | १० |

१०A)$ २५०० चौ.मी.पेक्षा कमी क्षेत्राचे औद्योगिक भूखंड :

| प्रभाग | क्षेत्र (चौ.मी.) | किमान गुंतवणूक (FCI) ( रुपये कोटीत) |
|---|---|---|
| अ | २,५०० चौ.मी. पर्यंत | ५ |
| ब आणि क | | ३ |
| ड आणि ड+ | | २ |

$ सदरील गंतवणूकीचे निकष दिनांक १९/१०/२०२५ पर्यंत लागू राहतील.

१०B)* २५०० चौ.मी.पेक्षा कमी क्षेत्राचे औद्योगिक भूखंड :

| प्रभाग | क्षेत्र (चौ.मी.) | किमान गुंतवणूक (FCI) (रुपये कोटीत) |
|---|---|---|
| अ | २,५०० चौ.मी. पर्यंत | ५ |
| ब | | ३ |
| क | १,००० चौ.मी. पर्यंत | १.५ |
| | १,००१ ते २,५०० चौ.मी. पर्यंत | ३ |

| | | |
|---|---|---|
| ड आणि ड+ | ५०० चौ.मी. पर्यंत | ०.४ |
| | ५०१ ते १,००० चौ.मी. पर्यंत | ०.८ |
| | १,००१ ते १,५०० चौ.मी. पर्यंत | १.२ |
| | १,५०१ ते २,००० चौ.मी. पर्यंत | १.६ |
| | २,००१ ते २,५०० चौ.मी. पर्यंत | २ |

* सदरील गंतवणूकीचे निकष दिनांक २०/१०/२०२५ पासून पुढे लागू राहतील.

II) भूखंड वाटपाची कार्यपध्दती:

१) महत्त्वाचे निवडक उद्योगांना (Specific Important Categories of Industries) आकारावयाचे दर/दर कक्ष [आधारभूत दर (Upset Rate) व उच्चतम दर (Cap Rate)] "मऔविम भूखंड वाटपाच्या दराबाबतचे धोरण" (MIDC Pricing Policy) नुसार लागू राहतील. (सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना (MSME) राखीव भूखंड वगळून)

२) अर्जदारास आधारभूत दरानुसार (Upset Rate) भूखंड किंमतीच्या ५ टक्के इसारा रक्कम (EMD) अर्जा सोबत ऑनलाईन जमा करणे आवश्यक आहे. पात्र व उच्चतम निविदाधारक निश्चित केल्यानंतर इतर अर्जदारांना तात्काळ ५ टक्के रक्कम (EMD) ऑनलाईन परत करण्यात येतील. (Online EMD Refund) (सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना (MSME) राखीव भूखंड वगळून)

३) या पध्दतीने औद्योगिक भूखंडाचे वाटप MILAAP पोर्टलवर अर्ज स्विकारून वाटपाची कार्यवाही करण्यात येतील. MILAAP पोर्टल हे नियमित (२४x७) सुरू राहील.

४) **भू-वाटप समितीची बैठक आणि अर्जावर कार्यवाही करण्याची कार्यपध्दती** (कॅप ई-निविदेद्वारे औद्योगिक भूखंड वाटप (Industrial Plot Allotment by Cap e-bidding):

a) प्रत्येक सोमवारी किंवा आठवड्याच्या कामकाजाच्या पहिल्या दिवशी भू-वाटप समितीची बैठक आयोजित करण्यात येईल. (Recurring LAC on every Monday or next working day by System.)

b) एखाद्या भूखंडाला पहिला अर्ज ज्या दिवशी प्राप्त होईल त्या दिवसापासून पुढील ५ कार्यालयीन दिवसानंतर येणाऱ्या भू-वाटप समितीच्या नियोजित बैठकीसमोर (१st scheduled LAC) त्या भूखंडासाठी प्राप्त झालेले सर्व अर्ज सादर करण्यात येतील.

परंतु, वरील प्रथम नियोजित भू-वाटप समितीसमोर (१st scheduled LAC) सादर करण्यात येणाऱ्या भूखंडास सदर भू-वाटप समितीच्या बैठकीपूर्वी नविन अर्ज प्राप्त झाल्यास सदर भूखंडासाठी प्राप्त सर्व अर्ज त्यापुढील नियोजित भू-वाटप समितीच्या बैठकीसमोर (२nd scheduled LAC) सादर करण्यात येतील. (Transfer All Applications to २nd scheduled LAC)

परंतु, वरील द्वितीय नियोजित भू-वाटप समितीसमोर (२nd scheduled LAC) सादर करण्यात येणाऱ्या भूखंडास सदर भू-वाटप समितीच्या बैठकीपूर्वी नविन अर्ज प्राप्त झाल्यास सदर भूखंडासाठी प्राप्त सर्व अर्ज त्यापुढील नियोजित भू-वाटप

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

समितीच्या बैठकीसमोर (३rd scheduled LAC) सादर करण्यात येतील. (Transfer All Applications to ३rd scheduled LAC)

**परंतु, सदर भूखंडासाठी द्वितीय नियोजित भू-वाटप समितीच्या बैठकीनंतर (२nd scheduled LAC) येणाऱ्या बुधवारी सायं. ५.०० वाजेपर्यंतच सदर भूखंडासाठी अर्ज स्विकारणेत यावेत. त्यानंतर अर्ज स्विकारणे बंद होईल.**

टीप: सर्व अर्जांची तांत्रिक छाननी नियोजित LAC पुर्वी सर्व संबंधितांनी करणे अनिवार्य आहे.

c) LAC च्या आयोजनात अध्यक्षांच्या परवानगीने तारीख व वेळेत बदल झाल्यास (LAC Reschedule) अर्जदारास तात्काळ ईमेल/एसएमएस द्वारे कळविण्यात यावे.

d) **भू-वाटप समितीचा निर्णय:**

i) **सविस्तर चर्चेअंती एकच अर्ज पात्र ठरल्यास आणि** भूखंड वाटपाचा निर्णय घेतल्यास अशा अर्जदारांचा वित्तीय लिफाफा (Financial Envelop (Cap Rate-दर कक्षेतील) अध्यक्ष अथवा महाव्यवस्थापक (भूमी) यांचेद्वारे उघडण्यात येईल आणि अर्जदाराद्वारे नमूद दराने भूखंडाचे वाटप करण्यात येईल.

ii) **एकापेक्षा जास्त अर्ज पात्र ठरल्यास, आणि अशा अर्जदारांना** भूखंड वाटपाचा निर्णय घेतल्यास अशा अर्जदारांचा वित्तीय लिफाफा (Financial Envelop (Cap Rate-दर कक्षेतील) अध्यक्ष अथवा महाव्यवस्थापक (भूमी) यांचेद्वारे उघडण्यात येईल आणि ज्या अर्जदारांने उच्चतम दर दिला आहे. त्या अर्जदारास नमूद उच्चतम दराने भूखंड वाटप करण्यात येईल.

iii) **समान उच्चतम दर/ टाय-ब्रेकिंग यंत्रणा** : एकापेक्षा जास्त पात्र अर्जदारांनी समान उच्चतम दर नमूद केला असल्यास अशा समान उच्चतम दर दिलेल्या अर्जदारांची त्याच LAC समोर अथवा अध्यक्षांनी निश्चित केलेल्या तारीख आणि वेळेनुसार पुनश्च LAC आयोजित करण्यात येईल.

अशा LAC समोर त्या अर्जदारांचा सविस्तर प्रकल्प अहवालाचे (DPR) पुनश्च सादरीकरण अंतिम निर्णयासाठी ठेवले जाईल. सादरीकरणा दरम्यान गुंतवणूक (Investment), नविन तंत्रज्ञान (New technology), नाविन्यपूर्ण उद्योग (Innovative Industry) इत्यादी बाबींचा भू-वाटप समिती विचारात घेईल. भू-वाटप समिती प्रस्तावित औद्योगिक प्रकल्पाच्या आर्थिक आणि सामाजिक फायद्यांचे मूल्यांकन करेल, ज्यामध्ये रोजगार निर्मितीची क्षमता, तांत्रिक प्रगती, पर्यावरणीय शाश्वतता आणि राज्याच्या औद्योगिक धोरण उद्दिष्टांशी सुसंगतता यांबाबत पुन्हा सविस्तर चर्चा करून निर्णय देईल.

LAC उपरोक्त बाबींचा सखोल विचार करून भूखंड वाटपाचा निर्णय घेईल. पात्र अर्जदाराने त्याने नमूद केलेल्या उच्चतम दराने भूखंडाचे वाटप करण्यात येईल. भू-वाटप समितीचा निर्णय सर्व अर्जदारांना बंधनकारक असेल.

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

e) चर्चा व निर्णयाच्या अनुषंगाने बैठकीचे इतिवृत्त तयार करण्यात येईल. तसेच, सदर इतिवृत्तास मंजूरी प्राप्त झाल्यानंतर तात्काळ भूखंड वाटपाबाबतची पुढील कार्यवाही (देकारपत्र, वाटपपत्र इत्यादी) ऑनलाईन करण्यात येईल.

f) अर्जदाराने दिलेला दर हा आधारभूत /न्युनतम (upset Rate) दरापेक्षा कमी नसावा.

g) **एकाच औद्योगिक भूखंडास A व B दोन्ही पध्दतीने अर्ज प्राप्त झाल्यास, A पध्दतीने प्राप्त झालेल्या अर्जास प्रथम प्राधान्य देवून इतर सर्व अर्जदारांचे अर्ज व प्रक्रिया शुल्क ऑनलाईन परत (Online Refund) करण्यात येईल.**

h) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विकेंद्रीत केलेल्या वाटपाच्या अधिकारानुसार (Delegation of Powers) संबंधित भू-वाटप समितीद्वारे या पध्दतीने भूखंडाचे वाटप करण्यात येईल.

## C) खुल्या ई-निविदेद्वारे वाटप (Allotment by Open e-bidding):

औद्योगिक क्षेत्राचा आराखडा तयार करतांना CPDCR-२०२३ नुसार औद्योगिक क्षेत्रामध्ये काही प्रमाणात व्यापारी व निवासी भूखंडांचे आरेखन करण्यात येते. अशा भूखंडावर केवळ व्यापारी/निवासी वापर करण्यास परवानगी असल्यामुळे असे भूखंड केवळ खुल्या ई-निविदेद्वारे वाटप करण्याचे महामंडळाचे धोरण आहे.

I) प्रवर्ग (Categories of Industries):

**सर्व व्यापारी व निवासी भूखंड/गाळे तसेच औद्योगिक गाळे/शेड/प्लग अँड प्ले गाळे/शेड खुल्या ई-निविदेद्वारे वाटप करण्यात यावे.** (महामंडळाच्या धोरणानुसार मऔविम अधिकारी/कर्मचारी यांचेकरीता राखीव निवासी भूखंड वगळून)

- महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील किंवा क्षेत्रानजीकच्या कामगारांना कामाच्या ठिकाणापासून जवळच परवडणारी घरे (Affordable Housing and vertical apartments) मिळावेत असे मऔवि महामंडळाचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे वैयक्तिक नावे भूखंड वाटप न करता कमी जागेत जास्त कामगार/कुटूंबे सामावून घेण्यासाठी यापुढे निवासी भूखंडाकरीता केवळ नोंदणीकृत /नियोजित गृहनिर्माण संस्था अर्ज करण्यास पात्र असतील.
- अर्ज सादर करतांना सभासदांची नावे, पॅनकार्ड, पत्ता इत्यादी सविस्तर माहिती सादर करणे आवश्यक आहे.

II) भूखंड वाटपाची कार्यपध्दती:

१) भूखंडाचे दर "मऔविम भूखंड वाटपाच्या दराबाबतचे धोरण" (MIDC Pricing Policy) नुसार लागू राहतील. या पध्दतीने वाटप करतांना आधारभूत दर (Upset Rate)= प्रचलित दर + प्रचलित दराच्या १० टक्के असा परिगणित करण्यात येईल. खुली ई-निविदा असल्यामुळे कोणताही उच्चतम दर निश्चित राहणार नाही.

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

२) अर्जदारास आधारभूत दरानुसार (Upset Rate) भूखंड किंमतीच्या ५ टक्के इसारा रक्कम (EMD) अर्जा सोबत ऑनलाईन जमा करणे आवश्यक आहे. पात्र व उच्चतम निविदाधारक निश्चित केल्यानंतर इतर अर्जदारांना तात्काळ ५ टक्के रक्कम (EMD) ऑनलाईन परत करण्यात येतील. (Online EMD Refund).

३) या पध्दतीने औद्योगिक भूखंडाचे वाटप MILAAP पोर्टलवर अर्ज स्विकारून वाटपाची कार्यवाही करण्यात येतील. MILAAP पोर्टल हे नियमित (२४x७) सुरू राहील.

४) **भू-वाटप समितीची बैठक आणि अर्जावर कार्यवाही करण्याची कार्यपध्दती :**
**सर्व व्यापारी व निवासी भूखंड/गाळे तसेच औद्योगिक गाळे/शेड/प्लग अँड प्ले गाळे/शेड खुल्या ई-निविदेद्वारे वाटप**

a) एखाद्या भूखंड/गाळ्यास अर्ज प्राप्त झाल्यापासून प्रथम ७ दिवसात किमान ३ अर्ज प्राप्त न झाल्यास तसेच सदर एकूण प्राप्त अर्जांपैकी किमान ३ अर्ज पात्र न ठरल्यास अशा भूखंडाकरीता अर्ज स्विकारण्याचा कालावधी ७ दिवसांनी (१st Extension) वाढविण्यात यावा.

b) १st Extension च्या कालावधीमध्ये देखील किमान ३ अर्ज प्राप्त न झाल्यास तसेच सदर एकूण प्राप्त अर्जांपैकी किमान ३ अर्ज पात्र न ठरल्यास अशा भूखंडाकरीता अर्ज स्विकारण्याचा कालावधी पुनः ७ दिवासांनी (२nd Extension) वाढविण्यात यावा.

c) २nd Extension कालावधी संपल्यानंतर सदर भूखंडासाठी प्राप्त सर्व अर्ज (किमान ३ अर्ज प्राप्त होण्याचा अथवा पात्रतेचा निकष विचारात न घेता) भू-वाटप समितीसमोर सादर करावेत.

५) **भू-वाटप समितीचा निर्णय:**

a) **सर्व पात्र अर्जदारांचे वित्तीय लिफाफा (Financial Envelop)** LAC अध्यक्ष अथवा महाव्यवस्थापक (भूमी) यांचेद्वारे उघडण्यात येईल आणि ज्या अर्जदारांने उच्चतम दर दिला आहे. त्या दराने भूखंड वाटप करण्यात येईल. अर्जदाराने दिलेला दर हा आधारभूत /न्युनतम (upset Rate) दरापेक्षा कमी नसावा.

b) **समान उच्चतम दर/ टाय-ब्रेकिंग यंत्रणा :** एकापेक्षा जास्त पात्र अर्जदारांनी समान उच्चतम दर नमूद केला असल्यास अशा समान उच्चतम दर दिलेल्या अर्जदारांची "Close Bidding" घेवून पुनश्च दर मागविण्यात यावेत. तथापि, Close Bidding करीता आधारभूत किंमत ही अर्जदारांनी दिलेला उच्चतम दर असेल.

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

c) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विकेंद्रीत केलेल्या वाटपाच्या अधिकारानुसार (Delegation of Powers) संबंधित भू-वाटप समितीद्वारे या पध्दतीने भूखंडाचे वाटप करण्यात येईल.

## एमआयडीसी औद्योगिक भूखंड वाटप धोरण (MIDC Industrial Land Application and Allocation Policy-MILAAP) :

I) अटी व शर्ती :

१) Ease of Doing Business अंतर्गत अधिक पारदर्शकता, सुसुत्रता आणि गतिमानता आणण्यासाठी वर नमूद भूखंड वाटपाच्या पध्दतीने (A, B व C) भूखंड मागणीचे सर्व अर्ज हे महामंडळाच्या संकेतस्थळावर (www.midcindia.org) ऑनलाईन अर्ज (e-Application) MIDC Industrial Land Application and Allocation Portal **(MILAAP)** वर सादर करणे अनिवार्य आहे.

२) अर्ज व प्रक्रिया शुल्क :

| अ.क्र. | मागणी केलेले क्षेत्र | वाटपासाठी अर्ज व प्रक्रिया शुल्क (रूपयामध्ये) + जीएसटी |
|---|---|---|
| १. | १०,००० चौ.मी क्षेत्रफळापर्यंत | १०,०००/- |
| २. | १०,००१ ते २०,००० चौ.मी क्षेत्रफळापर्यंत | २०,०००/- |
| ३. | २०,००१ ते ४०,००० चौ.मी क्षेत्रफळापर्यंत | ४०,०००/- |
| ४. | ४०,००१ चौ.मी व त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या भूंखडासाठी | ५०,०००/- |

३) MILAAP द्वारे भूखंड वाटपाचे दर "मऔविम भूखंड वाटपाच्या दराबाबतचे धोरण" (MIDC Pricing Policy) नुसार लागू राहतील.

४) अर्जासोबत सविस्तर प्रकल्प अहवालासह व पर्यावरण विषयक मुद्दांबाबतची माहितीसह **(परिशिष्ट-१ प्रमाणे)** आवश्यक सर्व कागदपत्रे / दस्तऐवज, शासकीय परवाने, इत्यादि ऑनलाईन अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे.

५) वाटप भूखंडाच्या विकास कालावधी व किमान चटई निर्देशांकाचा वापराबाबतचे प्रचलित धोरण लागू राहील.

६) MILAAP **नुसार** वाटप केलेल्या भूखंडासाठी महामंडळाचे मुदतवाढीबाबत चे प्रचलित धोरण राहील.

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

(७) वाटप केलेला भूखंड देकारपत्र/वाटपपत्र/करारनाम्यातील तरतुदींनुसार आणि महामंडळाच्या धोरणानुसार विहित कालावधीमध्ये विकसित न केल्याच्या कारणास्तव अथवा इतर कारणास्तव, भूखंडधारकाने स्वतःहून महामंडळास परत केलेले भूखंड तात्काळ रिक्त भूखंडाच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात यावा.

**II) MIDC Industrial Land Application and Allocation Portal (MILAAP):**

- अर्जदाराद्वारे अर्ज सादर करणे, अर्जाचे शुल्क/प्रक्रिया शुल्क स्विकारणे, अर्जाची acknowledgement, तांत्रिक छाननी, अभिप्राय (तांत्रिक सल्लागार आणि पर्यावरण व इतर विभागाचे), तांत्रिक छाननी तक्ता (Scrutiny Sheet), भू-वाटप समितीची बैठक आयोजित करणे, बैठकीबाबत संबंधित अर्जदारास कळविणे, अजेंडा, इतिवृत्त तसेच वाटपासंदर्भातील प्रक्रियाई-देकारपत्र व ई-वाटपपत्र (e-Offer Letter & e-Allotment Order) किंवा ई-आरक्षित पत्र (e-Comfort Letter) इत्यादी सर्व बाबी महामंडळाच्या ऑनलाईन पोर्टलवर (MILAAP) करण्यात यावे.
- भूखंड वाटपा संदर्भातील **परिशिष्ट-२** मध्ये नमूद परिपत्रके सदर धोरणाच्या दिनांकापासून रद्द/अधिक्रमित/निरस्त करण्यात येत आहेत.
- परिशिष्ट-२ मध्ये नमूद परिपत्रकांनुसार सर्व प्रलंबित भूखंड मागणी अर्ज रद्द करण्यात येत आहेत. अशा रद्द अर्जांकरीता प्राप्त प्रक्रिया शुल्क परत करण्यात यावे.
- MILAAP धोरण दिनांक ०३.०९.२०२५ पासून लागू करण्यात येत आहे. तसेच, MILAAP पोर्टल सुरू झाल्यापासून सदर धोरणाचे परिपत्रक निर्गमित करण्याच्या दिनांकपर्यंत नाकारण्यात (Rejected MILAAP Application) आलेल्या अर्जांचे प्रक्रिया शुल्क परत करण्यात यावे.

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

(पी. वेलरासू, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
मऔविम, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

प्रत:

(१) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुख्यालय, मुंबई
(२) मुख्य अभियंता (पुणे/छत्रपती संभाजीनगर/नागपूर)
(३) महाव्यवस्थापक (भूमी/ विधी/भूसंपादन/मा व तं /जनसंपर्क/ मबवि/डीएमआयसी/पणन)
(४) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम
(५) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम
(६) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम
(७) सह / उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे/छत्रपती संभाजीनगर/ नागपूर.
(८) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
(९) सर्व औद्योगिक संघटना
(१०) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती / मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ, मुंबई / जागतिक व्यापार केंद्र, मुंबई.

# परिशिष्ट-१

( सविस्तर प्रकल्प अहवाल व कागदपत्रे)

Detailed Project Report (DPR)

**Part A:**

1) Introduction
2) Promoter's Profile
3) Constitution of the Company/Firm: Proprietary, Partnership Firm, Private /Public Ltd., Co-operative Society, PSUs etc.
4) Registration details: Registration of company, Partnership firm, Society, Charitable Trust etc.
5) Unit Registration details: IEM, LoI, EM, IT/BT Registration, GST registration etc.
6) Existing Business of the Promoters & the details thereof.
7) Location & its selection. (including rationality behind selection of location)
8) Details of the products with capacities per day in Nos. / Metric tons/ Meters.
9) Details of raw materials with required quantity.
10) Markets & its analysis.
11) Project cost details with expenditure on land, land development, buildings, plant and machinery, electrification, technical know-how, utilities, other fixed assets, preliminary & pre-operations, contingencies etc.,
    a) Land & its developments-area required, rate value, justification of area, land development to be carried out and its cost, special land requirements.
    b) Building- Built up area, rate, cost of construction, block layout plan of all facilities required.
    c) List of plant & machinery with supplier, quantity, value imported/ indigenous etc.
    d) Electrification- List of items, supplier, service line charges, MSEDCL charges etc.
    e) Technical Know-how: imported/ indigenous, nature, supplier, cost.
    f) Utilities: Compressed Air, Water, Steam & such other installation.
12) **Means of Finance:** Equity (Rupees/FDI), Term Loan, ECB, Unsecured Loan, Internal Cash Accruals etc. (including details of financial credibility of the promoter with Net worth certificate issued by C.A.)
13) Implementation Schedule with time chart.
14) Financial Analysis- Cash flow, Fund flow, profitability, breakeven ration analysis, debt servicing etc.
15) Details about proposed technology.
16) Source of energy to be used & measures to be taken for conversion of Energy & promotion of renewable energy.

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

**17)** Pollution Control Measures:
  a) Process flow chart with material/mass balance.
  b) Block plan showing space for pollution control facilities viz (ETP, STP, HW/SW), space for green belt development etc.
  c) Water budget with recycling/reuse of treated effluent/sewage including ZLD scheme wherever possible.
  d) Environment Management plan.
  e) MPCB's consent copy/EC copy if obtained for existing units.
  f) Distance of eco-sensitive zone/areas from the proposed plot location.

**18)** Whether proposed products area import substitute/ to be exported, the details thereof.

**19)** Direct & indirect employment to be generated.

**20)** Extra land requirement in specific cases
  a) For raw material storage, method of storage, storage layout & area calculation etc.
  b) Finished products Storage method, stacking, storage layout and area calculations etc.
  c) Statutory requirement such as explosive control requirement etc.

**21)** For Expansion Project – Utilization of existing plot, MPCB's Consent to Operate of existing plot, MSEDCL Bills, Product sale bills, work order in hand details etc.

**22)** All above documents are mandatory and must be signed by the applicant/authorized person.

ooooo

**Part B:**

(Processing of Project Proponents application for comments of Environment Section for LAC meeting.) (Circular No. CEO/MIDC/A29417 Dt 06.02.2019)

The e-applications of the project proponents for LAC meeting is referred to Environment Section for comments. However, while scrutinizing, it is observed by Environment Section, that most of the important information required to scrutinize the application from environmental point of view either not submitted by the project proponents or submitted partially. Hence, it becomes necessary to obtain the information from the project proponents and thus it delays the allotment process.

Applicant shall submit following information alongwith e-Application. Therefore, all Regional Officers are hereby instructed to ensure that following information is submitted by the project proponents while submitting the application. If the said information is not submitted along with the application, then it shall be immediately called online from the project proponents and then the application be processed to avoid delay in land allotment process.

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

| **Sr. No.** | **Document Required** | **Submitted** | |
|---|---|---|---|
| | | **Yes/ No** | **Comments/Remarks** |
| 1 | Name of all raw materials and its quantity per year. | | |
| 2 | Name of all finished products with quantity per year. | | |
| 3 | Manufacturing process flow sheets of all products manufactured/to be manufactured. | | |
| 4 | Quantity of water required for domestic, industrial, cooling, gardening, etc. with detailed water budget. (Cubic Meter) | | |
| 5 | Industrial/ Trade effluent generation from all manufacturing process and its quantity per year | | |
| 6 | Domestic waste water generation and its quantity. | | |
| 7 | Domestic and industrial effluent treatment plant details i.e. STP and ETP, its capacity existing /proposed along with inlet and outlet effluent characteristics and disposal mode. | | |
| 8 | Disposal details of domestic and industrial effluent Le CETP/on land for irrigation/gardening/open nala/recycle and reuse/any other mode of disposal. | | |
| 9 | Air Pollution Control System installed/proposed to be installed. | | |
| 10 | Solid Waste, if any, generated its quantity and disposal methodology. | | |
| 11 | Hazardous waste, if any generated its quantity and disposal Methodology. | | |
| 12 | Copy of consent to be obtained/applied from MPCB. establish/operate | | |
| 13 | Copy of Environmental Clearance applied/obtained from State/Central Govt., If applicable. | | |
| 14 | A detailed report on Environment Management Plan. | | |
| 15 | Number of trees planted and to be planted with name of species and open space available within factory premise for tree plantation. | | |

ooooo

**Part C:**

(उद्योग विस्तारकरीता अर्ज सादर सोबत सादर करावयाची कागदपत्रे)

| अ.क्र. | तपशील | कागदपेत्रे सादर केली आहेत/नाहीत | शेरा |
|---|---|---|---|
| १. | ई-अर्ज क्रमांक. व दिनांक | | |
| २. | उद्योग विस्ताराचा सविस्तर प्रकल्प अहवाल (परिशिष्ट -१ नुसार) | | |
| ३. | मूळ भूखंडाच्या जागेचा केलेला वापर आणि उद्योग विस्तारासाठी मागणी केलेल्या जागेचा वापर दर्शविणारा प्रमाणित केलेला एकत्रित नकाशा (Block Plan) | | |
| ४. | मागील ३ वर्षाचे लेखापरिक्षण झालेला वार्षिक अहवाल | | |
| ५. | मुळ भूखंडावरील उत्पादित मालासाठी प्राप्त झालेल्या अतिरिक्त मागणी पत्राच्या प्रमाणित प्रती (Orders In Hand) | | |
| ६.१ | मूळ भूखंडावरील उद्योगांसाठी प्राप्त केलेले EM Part-II/IEM Part B ची प्रत | | |
| ६.२ | औद्योगिक परवाना प्रमाणपत्र (आवश्यक असल्यास) | | |
| ६.३ | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रमाणपत्र (Consent ot Operate) | | |
| ६.४ | कारखाना उत्पादनात असल्याची दर्शविणारी कागदपत्रे (उदा. मागील ६ महिन्यातील वीज देयके, प्रॉडक्शन एँड सेल्स अबस्ट्रॅक, एक्साईज रजिस्टर अबस्ट्रॅक, GST Return) | | |
| ७. | जीएसटी/व्हॅट प्रमाणपत्र | | |
| ८. | उत्पादनाच्या मागणीच्या प्रती | | |
| ९. | मूळ भूखंड उत्पादनात गेल्याबाबतची कागदपत्रे | | |
| १०. | उप अभियंता यांचेकडील ना थकबाकी प्रमाणपत्र | | |

oooooo

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

(उद्योग विस्तारकरीता)

| अ.क्र. | तपशील | विस्तृत माहिती | शेरा |
|---|---|---|---|
| अ) | | | |
| १. | औद्योगिक क्षेत्राचे नाव | | |
| २. | अर्जदार/कंपनीचे नाव | | |
| ३. | सद्याचा भूखंड/शेड /गाळा क्र. व क्षेत्रफळ | | |
| ४. | घटना (Constitution) | | |
| ५. | मूळ भूखंडाचे वाटपपत्र दि. | | |
| ६. | मूळ भूखंडाचा ताबा दि. | | |
| ७. | मूळ भूखंडाचा विकास कालावधी | | |
| ८. | प्राथमिक करारनामा | | |
| ९. | प्राथमिक करारनामा नोंदणी /कार्यान्वित दिनांक | | |
| १०. | बांधकाम पूर्णत्वाचा दाखला दि. | | |
| ११. | एकूण बांधकाम व चटई निर्देशांक वापर | | |
| १२. | अंतिम करारनामा/मुदतपूर्व अंतिम करारनामा | | |
| १३. | भूखंड तारण | | |
| १४. | त्रिपक्षीय करारनामा | | |
| १५. | सध्याचे उत्पादन | | |
| १६. | उप अभियंता यांचा सद्यःस्थिती अहवाल | | |
| १७. | प्रमुख भूमापकाचा अहवाल | | |
| १८. | मुळ भूखंडाचा वापर CDCPR/DCR नुसार आहे का ? | | |
| १९. | मूळ भूखंडावर पोटभाडेकरू ठेवलेला आहे का ? | | |
| २०. | भूखंडधारकाने अतिक्रमण केलेले आहे का ? | | |
| २१. | अंतिम/मुदतपूर्व अंतिम करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केला आहे का ? | | |
| ब) | | | |
| १. | उद्योग विस्तारासाठी मागणी केलेला भूखंड, क्षेत्र आणि औद्योगिक क्षेत्राचे नाव | | |
| २. | उद्योग विस्तारासाठी वाटपाचा प्रचलित दर | | |
| ३. | मागणी केलेल्या भूखंडावरील प्रस्तावित उत्पादन | | |
| ४. | मागणी केलेल्या जागेवरील एकूण गुंतवणूक | | |

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | मागणी केलेल्या भूखंडाची सद्यःस्थिती | | |
| ६. | मागणी केलेल्या भूखंडास इतर कोणाचा अर्ज प्राप्त आहे का ? | | |
| ७. | मागणी केलेल्या जमीनीमधील (Land) गुंतवणूक एकूण प्रकल्पामधील गुंतवणूकीपेक्षा किती टक्के आहे. (Land Cost/Total Investment *१००) | | |
| ८. | उद्योग विस्ताराच्या भूखंडावर प्रस्तावित बांधकाम (Proposed B.U.A/Area Demanded*१००) | | |
| ९. | प्लांट अँड मशनरी मधील गुंतवणूक | | |
| १०. | रोजगार निर्मिती | | |
| ११. | विद्युत भार | | |
| १२. | पाण्याची गरज | | |
| १३. | गुंतवणूक व्यवस्था (स्वतः, बँक, परकीय, इतर) | | |
| १४. | भूखंड वाटपाबाबत प्रादेशिक अधिकारी यांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय. | | |

oooooo

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

# परिशिष्ट-२

## (रद्द/अधिक्रमित परिपत्रकांची यादी)

१. परिपत्रक क्रमांक मऔविम/विधी व कामकाज /४०, दिनांक २९.०१.२००८,

२. परिपत्रक क्रमांक मऔविम/विधी व कामकाज /१५३/२०१२, दिनांक २७.०४.२०१२,

३. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/कार्यासन-१/३३२२, दिनांक १९.१२.२०१२,

४. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/कार्यासन-१/८४६०, दिनांक ०७.०१.२०१३,

५. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/कार्यासन-१/ए११८२७, दिनांक १०.०१.२०१४,

६. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/कार्यासन-१/बी६२०५४, दिनांक ०३.०६.२०१४,

७. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/D१४५०२, दिनांक २६.०९.२०१६ (Online Direct Allotment)

८. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/D१४५४०, दिनांक २६.०९.२०१६ (E-bidding)

९. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/बी३२५८४, दिनांक १३.०४.२०१७,

१०. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/म.व्य (भूमी)/बी६५६४०, दिनांक ०९.०५.२०१७,

११. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/ई२४५३२, दिनांक २९.११.२०१७

१२. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/डी८२६४७, दिनांक १६.११.२०१८,

१३. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/म.व्य (भूमी)/ई०१३१४१, दिनांक ०३.१२.२०१८,

१४. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/ई३६७८८, दिनांक ३१.१२.२०१८,

१५. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/ए१५१४५, दिनांक ११.०१.२०१९,

१६. परिपत्रक क्रमांक मऔविम/म.व्य (भूमी)/बी८८१४७, दिनांक ०७.०६.२०१९,

१७. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/कार्यासन-१/बी९९३९३, दिनांक १७.०६.२०१९,

१८. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/म.व्य (भूमी)/सी७४९८६, दिनांक २०.०८.२०१९,

१९. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/म.व्य (भूमी)/सी७४९९६, दिनांक २०.०८.२०१९,

२०. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/म.व्य (भूमी)/डी०४७३३, दिनांक १३.०९.२०१९,

२१. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/म.व्य (भूमी)/ई१४७८५, दिनांक १३.१२.२०१९,

२२. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/म.व्य (भूमी)/ए९३२६०, दिनांक ११.०३.२०२०

२३. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/म.व्य (भूमी)/बी५०८६०, दिनांक ०१.०७.२०२०,

२४. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/म.व्य (भूमी)/डी१८८७९, दिनांक ०४.१२.२०२०

२५. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/ए८८९६७, दिनांक १६.०३.२०२१,

२६. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/A८९०१४, दिनांक १६.०३.२०२१.(Residential)

२७. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/म.व्य (भूमी)/सी६७७३६, दिनांक १७.०६.२०२१,

२८. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/म.व्यय(भूमी)/ई५५१०३, दिनांक २६.११.२०२१,

२९. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/म.व्य (भूमी)/ए९७७३८, दिनांक २१.०३.२०२२,

३०. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/ म.व्य (भूमी)/ए९७७७१, दिनांक २१.०३.२०२२,

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

३१. परिपत्रक क्रमांक मऔविम/तां.स./डी४२३१६ दि.१३.१०.२०२२ (DPR).

३२. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/ म.व्य (भूमी)/बी५७९३२, दिनांक १०.०५.२०२३,

३३. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/म.व्य (भूमी)/बी२३३७५, दिनांक ०४.०९.२०२३,

३४. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/म.व्य (भूमी)/पी९८४३१, दिनांक ०१.१२.२०२३,

३५. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/पी५८५६४, दिनांक १२.०१.२०२४ (ISRO)

३६. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/पी२०५९२८, दिनांक १५.०३.२०२४

३७. परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/म.व्य (भूमी)/पी१६४२०४, दिनांक १३.०१.२०२५,

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

0000000